# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

## मराठी विभाग – अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१८– १९

शैक्षणिक वर्ष २०१८– १९ मध्ये मराठी विषयाचे पदवी व पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करण्यासाठी सुमारे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. मा. प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील व डॉ. एच.एम.जरे यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एस.जे.पाचारणे, प्रा. वाय.जे. राऊत यांच्या सहकार्याने अध्यापन व उपक्रमांचे वार्षिक नियोजन करण्यात आले. अभ्यासक्रम पूर्ततेचा वेळोवेळी आढावा घेण्यात आला. जनसंपर्क व वृत्तपत्रविद्या हा अल्पकालीन अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी विभाग व मराठी वाङमय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

सोमवार दि.६.ऑगस्ट रोजी द्वितीय व तृतीय वर्ष मराठी विशेषस्तरावर अध्यापन करणा—या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे व मराठी वाङमय मंडळाच्या उद्‌घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी पुण्याच्या अक्षरपेरणी त्रैमासिकाचे संपादक प्रा. बाळासाहेब घोंगडे यांनी 'प्रकाशन व्यवसायातील संधी' या विषयावर विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

१२ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 'माझा देश : माझे मत' आणि 'जरा याद करो कुर्बानी' या विषयावर निबंध स्पर्धा, स्वातंत्र्य आणि जबाबदारी या विषयावर चर्चासत्र तर भारताचे भवितव्य या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला.

दि. २४ ऑगस्ट रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या शतकोत्तर दशकपूर्ती जयंतीनिमित्त अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील,  उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, झी मराठीवरील 'स्वराज्य रक्षक संभाजी' फेम देवेश मेदगे, उपस्थित होते.

दि. २५ सप्टेंबर रोजी एक दिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत प्रसिद्ध निवेदक श्री. कैलास मुसळे यांनी सूत्रसंचालन एक कला, प्रसिद्ध निवेदक श्री. कैलास दुधाळे यांनी सूत्रसंचालनाची तयारी, डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालनासाठी आवश्यक गुण, डॉ. बी. डी. अनुसे यांनी सूत्रसंचालनासाठीची कौशल्ये आदि विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि.२७ सप्टेंबर २०१८ रोजी गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक जागृती वाढावी या उद्देशाने चर्चासत्र आयोजित करण्यात आले. डॉ. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना काव्यगायनावर आधारित 'कवितेच्या गावा जावे' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि. १ नोव्हेंबर  रोजी वाचनसंस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी विद्यार्थ्यांना दिवाळी अंक भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी विविध साहित्यिक उपक्रमात सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचे सुमारे ५० युवा दिवाळी अंक व लोकमत वर्तमानपत्राचे सुमारे २५ दिवाळी अंकांचे वाटप करण्यात आले.

दि. १४ डिसेंबर रोजी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने साहित्यिक पु.ल. देशपांडे, गीतकार ग.दि.माडगुळकर, संगीतकार सुधीर फडके या महात्रयींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लेखन, काव्य आणि संगीत विषयांवरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन प्रसिद्ध लेखिका डॉ. संगीता बर्वे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, विनीता तेलंग, कवयित्री आश्लेषा महाजन, डॉ. वर्षा तोडमल, ज्योत्स्ना चांदगुडे, संगीतकार आशिष मुजुमदार, समीर शिवगार, प्राचार्य डॉ.एब.बी. पाटील उपस्थित होते. या कार्यशाळेत सुमारे  ४००च्या वर प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. समारोप कार्यक्रमात महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी गदिमा, सुधीर फडके यांची गीते सादर केली.  प्रशिक्षणार्थींना महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

दि. १जानेवारी २०१९ रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त 'मराठीतील संधी' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. शिरीष लांडगे पाटील यांचे 'भाषाभ्यासातील संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. ३ जानेवारी २०१९ रोजी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त भव्य हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाम सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. २० डिसेंबर २०१८ ते १० जानेवारी २०१९ दरम्यानयुवा विचारमंथन परिषदेचे आयोजन करण्यात आले. 'युवकांची दशा व दिशा, सोशलमीडिया आणि विद्यार्थी, व्यक्तिमत्त्व विकासात कला, क्रीडा व सांस्कृतिक घटकांचे योगदान आणि मला काही सांगायचंय' या विषयावर विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली.

दि. १६ ते १८ जानेवारी २०१९ दरम्यान 'असा हा महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत मराठी व भूगोल विभागातील सुमारे १०० विद्यार्थ्यांची एकत्रित शैक्षणिक सहल महाड, किल्ले रायगड, उन्हेरे येथील गरम पाण्याचे झरे, पालीचा बल्लाळेश्वर गणपती, जलदुर्ग असलेला कुलाबा आणि जंजिरा किल्ला, दिवेआगरचा ताम्रपट, बिर्ला मंदिर, हरिहारेश्वर, प्रतापगड, महाबळेश्वर, पाचगणी, वाईचा महागणपती आदि ठिकाणी आयोजित करण्यात आली.

दि. १९ ते २१ फेब्रुवारी दरम्यान विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पुण्याच्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील डॉ. मनिषा खैरे, प्रा. गौरी गोळे, प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मार्गदर्शन केले.

दि. २७ फेब्रुवारी रोजी जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त पाबळच्या पद्ममणि जैन कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर यांचे मराठी भाषेतील व्यावसायिक संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या निमित्ताने मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार करून 'चला मराठी म्हण जपू या' असा संकल्प करून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुमारे एक हजारांपेक्षा अधिक म्हणींचे संकलन करण्यात आले. कवी कुसुमाग्रज आणि साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचे अभिवाचनही करण्यात आले. मराठी भाषेतून राबविलेल्या स्वाक्षरी मोहिमेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दि. १ मार्च रोजी मराठी विभागाच्या वतीने 'मला भावलेले पुस्तक' या विद्यार्थी लेखांवरील ग्रंथाचे प्रकाशन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील उपकुलसचिव डॉ. शिवाजीराव अहिरे, संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील उपस्थित होते.

दि. १ ते ८ मार्च २०१९ दरम्यान जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जागर स्त्रीशक्तीचा या अभियानांतर्गत उंच माझा झोका या विषयावर मुक्त संवाद, तिला काही सांगायचंय या विषयावर स्वगत, आजची स्त्री खरंच आनंदी आहे का? या विषयावर निबंध स्पर्धा, आजच्या स्त्रियांपुढील आव्हाने या विषयावर चर्चासत्र, मुलगी शिकली प्रगती झाली? या विषयावर परिसंवाद आदि विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रियांचा आदर करण्याची, त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची तसेच स्त्री जन्माचे स्वागत करणारी शपथ देण्यात आली.

प्रथम व द्वितीय सत्रात विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेण्यात आली. अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्राचे आयोजन, शोधप्रकल्प घेण्यात आले. या शैक्षणिक वर्षात डॉ. संजय शिंदे यांनी नाशिक येथे उजळणी वर्ग, पुणे येथे अल्पकालीन अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांनी ३ राष्ट्रीय चर्चासत्रास उपस्थित राहून शोधनिबंधाचे वाचन केले. तसेच त्यांचे मान्यताप्राप्त संशोधन पत्रिकेतून ३ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

डॉ. संजय शिंदे

मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे.